UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे,
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## मार्च विशेषांक : २०२२ पुरवणी मराठी विशेषांक ०२

● संपादक मंडळ ●

• प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे • प्रा.डॉ.मृदुला वर्मा • प्रा.श्रीपाद नांदेडकर

● अतिथी संपादक ●

डॉ. अभयकुमार रमेश खैरनार
डॉ. पंढरीनाथ शिवदास पाटील
डॉ. दिपक दशरथ देवरे
डॉ. निलेश एकनाथ पाटील

● प्रकाशक ●

श्री. संजय मुंदडा
कार्याध्यक्ष
इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे-४२४ ००१
दूरध्वनी : (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००
संध्याकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

वार्षिक वर्गणी ₹ रु.५००/-
आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सुचना: संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक,ड्राफ्ट वगैरे
''संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ धुळे'' या नावाने पाठवावी

या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# * अनुक्रमणिका *


| अ.नं. | लेख व लेखकाचे नांव | क्रमांक |
|---|---|---|
| १. | मराठी कादंबरीतील शोषितांचे चित्रण / डॉ.संदिप जोतिराम भुयेकर, | १ |
| २. | साठोत्तरी साहित्य आणि समाज : उत्तर आधुनिक अनुबंध / प्रा.डॉ.संदीप कडू माळी | ६ |
| ३. | साहित्य आणि समाज : एक अनुबंध / प्रा.डॉ.वाल्मिक शंकर आढावे | १० |
| ४. | कोकणची संस्कृती, समाज आणि लोकमानस/ डॉ.विकास पाटील | १४ |
| ५. | खानदेशी समाज दर्शनाची वास्तव अभिव्यक्ती आणि अशोक कोळी यांची कथा / डॉ.निलेश पाटील | १८ |
| ६. | बन्धू माधवांच्या कथेतील सामाजिक व सांस्कृतिक तत्वज्ञानाचे शिंपण/प्रा.डॉ.अनिलकुमार पगारे | २५ |
| ७. | 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'या कादंबरीतील बदलते ग्रामविश्व/प्रा.डॉ.भैय्या पाटील | ३० |
| ८. | भारताच्या अंतर्गत सुरक्षेतील मानसिक आरोग्य एक सामाजिक समस्या/प्रा.डॉ.आर.एस.पवार | ३४ |
| ९. | कवी भुजंग मेश्राम यांच्या 'उलगुलान' या काव्यसंग्रहातील आदिवासी समाजदर्शन/प्रा.डॉ.व्ही.एस.आढावे,सुनिल वसावे | ३८ |
| १०. | समकालीन मराठी ग्रामीण कवितेतील उद्धवस्त खेड्यांचे चित्रण करणारी कविता / डॉ.अक्षय किशोर घोरपडे, | ४३ |
| ११. | भारतातील मांग/मातंग जातीची उत्पत्ती, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती व भौगोलिक स्थिती व भौगोलिक वितरणाचा अभ्यास / डॉ. प्रल्हाद यादव मगरे | ४९ |
| १२. | कोरोना महामारीच्या काळातील मृत्यु दराचा लोकसंख्या भूगोलाच्या दृष्टीने केलेला विश्लेषणात्मक अभ्यास/प्रा.संजय घोडसे | ५६ |
| १३. | मध्ययुगीन महाराष्ट्रातील उद्योगधंदे- एक अभ्यास/ प्रा.डॉ.शरद भामरे, प्रा.डॉ.निलेश पाटील | ६१ |
| १४. | ग्रामीण साहित्य लेखनातून भौगोलिक परिस्थितीचे अवलोकन/ डॉ.अजिनाथ नानाराव जिवरग | ६४ |
| १५. | धनगर समाजाची संस्कृती परंपरा व चालीरीती यांचा आढावा/प्रा.डॉ.दिलीप पाटील | ६८ |
| १६. | लेखक पत्नींच्या आत्मचरित्रातील भावदर्शन / डॉ.महेश बावधनकर | ७२ |
| १७. | साहित्य, समाज आणि संस्कृती / प्रा.डॉ.सचिन पाटील | ७७ |
| १८. | मराठी विज्ञान साहित्य, स्वरूप आणि वाटचाल / अश्विनी अनिल पालवे, डॉ.वसंत शेकडे | ८१ |
| १९. | लोकमान्य टिळकांचे राजकीय व सामाजिक विचारधन/ डॉ.संभाजी पाटील | ८७ |
| २०. | संत एकनाथांच्या भारुडांतील लोकविश्वास व लोककल्पनांतील लोकभ्रम/स्वाती लवंगे,डॉ.दिलीप पवार | ९५ |
| २१. | हास्यमालिकांची सामाजिकता व जनसामान्यांची मनोभुमिका आणि अपेक्षा !/ प्रा.पं.घनःश्याम थोरात | १०२ |
| २२. | इतिहास व लोकसंस्कृती / प्रा.डॉ.रमाकांत चौधरी | १०६ |
| २३. | तमाशातील लोककलावंतांची भाषा, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती गती /प्रा.डॉ. विनोद वासुदेव उपर्वट | ११० |
| २४. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षण यावरील महात्मा गांधीजींच्या प्रायोगिक शिक्षण योजना 'नई तालीम' योजनेचा प्रभाव/डॉ. रावसाहेब शेळके | ११६ |
| २५. | डिजिटल इंडिया आणि त्याचा समाज जीवनावर होणारा परिणाम / डॉ.आर.एस.वानखेडे, डॉ.अरविंद बडगुजर | १२२ |
| २६. | १९९० नंतर ची मराठी विज्ञान कादंबरी बदलते : समाज वास्तव / डॉ. वंदना लव्हाळे | १२६ |




Govt. College of Arts & Science
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

२७. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा परस्पर सबंध / बाळासाहेब नारायण बोराडे, प्रा.डॉ.वाल्मिक आढावे ........ १३१
२८. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे कथात्मक जाणीव संदर्भ / प्रा. सुभाष कदम ........ १३५
२९. शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ धुळे जिल्हा / प्रा.डॉ.संजय पाटील ........ १३३
३०. अहिराणी भाषिक लोकसमूहाचे भौगोलिक स्थळ व काळानुसार बदलते स्वरूप /डॉ.सदाशिव श्रीराम सुर्यवंशी ........ १४२
३१. साहित्य, समाज आणि संस्कृती / डॉ.अश्विनी भामरे ........ १४५
३२. संयुक्त राष्ट्रसंघ आणि महिला सबलीकरण /डॉ. सुवर्णा पंडित सुर्यवंशी ........ १४९
३३. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये असलेल्या वाङ्मयीन अभिरूचीचा अभ्यास/डॉ.तुषार माळी ........ १५३
३४. कवी वाहरु सोनवणे यांच्या कवितेतून दिसणारे आदिवासी जीवन/ प्रा.पाडवी अनिता, डॉ.माधव कदम ........ १५८
३५. धुळे शहरातील ख्रिस्ती मिशनरींचे कार्य / प्रा. विजय साळुंखे ........ १६२
३६. साहित्य, संस्कृती व समाज : परस्परसंबंध / डॉ. मधुचंद्र भुसारे ........ १६६
३७. राष्ट्रसंत तुकडोजी यांच्या ग्रामगीतेतील सामाजिक व सांस्कृतिक विचार / डॉ.संजय खैरनार ........ १७०
३८. तंजावरील मराठी लोकांची श्रद्धास्थाने व साहित्य / डॉ. एकनाथ फुटाणे ........ १७४
३९. आदिवासी चरित्रामधील सांस्कृतिक दर्शन / डॉ. कुंदा कवडे ........ १७९
४०. खान्देशातील माळी जातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास / श्री. संदिप भदाणे,डॉ.मनिषा कचवे ........ १८३
४१. सद्यस्थितीतील भारतातील राजकीय संस्कृती / प्रा.डॉ.संदिप नेरकर ........ १८६
४२. गोपाळ या भटक्या समाजातील लोकगीते / ललिता गोपाळ ........ १९३
४३. खानदेशातील हाटकर या भटक्या जमातीच्या लोकगीतातून सामाजिक सांस्कृतिक जीवन / प्रा.डॉ.हिरालाल पाटील ........ १९८
४४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारपृष्ठांवर संपृष्ठ झालेल्या दलित नाटकांचा आशय व आकृतीबंध/प्रा.डॉ.सुधाकर चौधरी ........ २०३
४५. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना हिंदी विषय शिकवितांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास / डॉ.गजानन खेकाडे ........ २०७
४६. स्त्रियांचे सबलीकरण / डॉ.एन.एन.लांडगे ........ २११
४७. मराठी आदिवासी साहित्य संस्कृती / डॉ.दीपक सूर्यवंशी ........ २१५
४८. मराठी विज्ञानसाहित्य आणि समाजजीवन / डॉ.विलास धनवे ........ २१९
४९. मराठा समाजातील महिलांचा राजकीय सहभाग: एक अभ्यास (धुळे जिल्ह्याच्या विशेष संदर्भात)/प्रा.विजय सुर्यवंशी ........ २२३
५०. ग्रंथालय व्यवस्थापनातील आधुनिक प्रवाह / राहुल जाधव ........ २२८
५१. साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रादेशिक प्रवाह : एक शोध / प्रा. सुभाष जयसिंग कदम ........ २३२
५२. कुणबी–मराठा समाजाची सामाजिक पार्श्वभूमी आणि या समाजातील स्त्रियांचा राजकीय सहभाग /प्रा.डॉ. संतोष एस.खत्री, राकेश भिमराव पाटील ........ २३६
५३. शिरपूर शहरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास /डॉ.अरविंद बी.पाटील ........ २४०
५४. संत एकनाथांच्या प्राणीविषयक भारूडातील लोकतत्त्वे/ स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार ........ २४४



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# तंजावरील मराठी लोकांची श्रद्धास्थाने व साहित्य

डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे
मराठी विभागप्रमुख, मशिसे गट– 'अ'
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.
मो. ७७९८१७७४७३

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राची संस्कृती ही आर्य व द्रविड संस्कृतीचा समन्वय आहे. भौगोलिक दृष्टीने विचार केला तरी महाराष्ट्राच्या सीमा तेलंगणा, कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, व छत्तीसगड या राज्याशी संलग्न आहेत. महाराष्ट्र भारताच्या जवळपास मध्यभागी आहे. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबे सीमावर्ती भागाबरोबरच देशातील प्रत्येक राज्यात कमी–जास्त प्रमाणात विखूरलेली दिसून येतात. मराठी–कन्नड, मराठी–तेलगू, मराठी–तमिळ, मराठी–मल्याळम अशी द्विभाषिक कुटुंब देखील देशातील विविध भागात आढळतात. अशा परिस्थितीत भाषा, परंपरा, सण, उत्सव, श्रद्धा, समजूती, व वैकल्य यांचे संक्रमण होणे साहजिकच आहे. शिवाय यातून देवाण–घेवाणही होते. यातून संमिश्र संस्कृती उदयास येतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) तंजावर येथील मराठी साहित्यावर दृष्टिक्षेप टाकणे.

२) तंजावर येथील मराठी भाषिकांच्या श्रद्धास्थानाची ओळख करून देणे.

३) तंजावर येथील मराठी संस्कृतीचा शोध घेणे.

४) तंजावर येथील मराठी साम्राज्यातील कला व संस्कृतीची माहिती मिळविणे.

५) तंजावर येथील अनोख्या भाषासंगमाचा अभ्यास करणे.

मराठी भाषिक जसे उत्तरेत विविध राज्यात वस्तीस आहेत तसेच दक्षिणेत देखील आहेत. त्यांनी आपली भाषा, संस्कृती, रूढी–परंपर यांचे संवर्धन केले आहे. भारतात विविध भागात मराठी भाषिक समुदाय स्थायिक होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ऐतिहासिक–राजकीय होय. शिवकाळ आणि शिवकाळानंतर दक्षिणेकडे मराठी लोकांचे संक्रमण जास्त प्रमाणात झाले. दक्षिणेकडे मराठा सरदारांना मुलुखगिरीवर गेल्यानंतर वतने, इनामे, जहागिरी मिळाली. यामुळे अनेक मराठा सरदार आपल्या बिऱ्हाड व लवाजम्यासह दक्षिणेत स्थिर झाले. शिवकाळात दक्षिणेत स्थायिक झालेली कितीतरी कुटुंबे आढळून येतात. छत्रपती शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी याने तंजावरच्या नायक राजाच्या गृहकलहात यशस्वीपणे हस्तक्षेप केला व तंजावरचे राज्य इ. स. १६७५ मध्ये मिळविले. हे आदिलशाहच्या अखत्यारितील राज्य होते. शिवरायांनी कर्नाटक स्वारीत व्यंकोजीने शत्रूत्वाची भूमिका घेऊन देखील हे राज्य अबाधित ठेवले. व्यंकोजीनंतर शहाजी, सरफोजी व तुकोजी या बंधुनी १७३६ पर्यंत राज्य केले. तुकोजीनंतर एकोजी, प्रतापसिंह, तुळजाजी दुसरा सरफोजी आणि तद्नंतर शिवाजी असे मराठी राजे मतंजावरफन्नर झाले. शिवाजीला संतान नसल्यामुळे हे राज्य इंग्रजांनी खालसा केले.

सरफोजी यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक ग्रंथ आणि हस्तलिखिते गोळा केली होती. अरबी–फार्सी भाषांमधील अनेक ग्रंथाची भाषांतरे करवून घेतली. भोसले कुलातील राजे तंजावरला राजसत्ता चालविण्याकरिता तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्रातून अनेक संत, महंत, पंडित, विद्वान, कवी, शास्त्रज्ञ, कुशल कारागीर, शिपाई, तंजावर आणि परिसरात स्थायिक झाले. तेव्हापासून तंजावरी मराठी भाषा, संस्कृती वृद्धींगत होत गेली.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

विद्वतसभा :

आदिलशाहीचे सुभेदार म्हणून शहाजी राजे यांचे बंगळूर प्रांतात इ. स. १६३७ ते १६६३ या काळात जवळपास पंचवीस वर्ष वास्तव्य होते. येथे शहाजी राजांचा स्वतंत्र दरबार होता. जयरमा पिंड्येविरचित 'राधामाधवविलासचंपू' या ग्रंथात विविध भाषांतील एकूण पस्तीस विद्वान बंगळूरला शहाजीराजांच्या दरबारात होते अशी नोंद आहे. यामध्ये उत्तरेकडील भाषा जाणणारे काही विद्वान होते. तसेच कन्नड-तेलुगु आदि दाक्षिणात्य भाषांपंडितही होते. अर्थात बंगळूर हे काही काळ छोटे तंजावरच होते अशी नोंद डॉ. मानिक धनपलावर१ करतात. व्यंकोजीनी तंजावर घेतल्यावर बंगळूरची ही सर्व विद्वान मंडळी तंजावरला आली. मराठ्यांचा भाषिक व सांस्कृतिक दृष्ट्या संपूर्णत: भिन्न अशा प्रांताशी संबंध प्रस्थापित झाला. तंजावरवरील मराठी राजाची सत्ता ही १८० वर्ष होती. या काळात वर उल्लेख केल्याप्रमाणे दहा मराठी राजे होऊन गेले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे नायक राजांची कवी आणि विद्वान पंडिताना राजाश्रय देण्याची परंपरा मराठ्यांनीही पुढे चालविली. मराठ्यांच्या काळात साहित्य निर्मितीला व विविध कलांना पूर्वीपेक्षाही अधिक प्रोत्साहन मिळाले.'[२] याचीच परिणती महणून तंजावरील नायक व मराठी राजे यांच्या साधारणत: तीनशे वर्षाच्या राजवटीत विपुल संस्कृत साहित्य निर्माण झाले. विविध साहित्यप्रकारात या कवींचा संचार होता. तंजावरच्या मराठी समाजाचा इतिहास हा तीन शतकाचा आहे. १८५५ मध्ये मराठ्याचे राज्य संपुष्टात आले. तेथील मराठी समाज हा मराठी भाषा व संस्कृतीचे जतन करीत आहे. तंजावरच्या मराठी समाजाने मतमिळफ संस्कृतीची जवळीक केली असली तरी त्यांनी मराठी साहित्य संस्कृतीची मनाळफदेखील कायम केली आहे.

'तंजावर' हे भौगोलिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध असे ठिकाण आहे. दक्षिण भारतात तंजावरचा मुक्तकंठाने गौरव केला जातो. कावेरी नदी या प्रांताचे वैभव वाढवते. या संदर्भात टी.आर. भीमराव म्हणतात, ''सुप्रसिद्ध कावेरी नदी या प्रांतातून स्वैर विहार करीत असल्यामुळे तिच्या विपुल व विमल जलाने त्यास एक प्रकारे विशेष सृष्टिसौंदर्य आणि विशेष सुपीकता प्राप्त झाली आहे. वंग देशाच्या एक भागास गंगा नदीच्या बहुमुखांनी अवर्णनीय शोभा प्राप्त होऊन तयास जैसे 'सुंदरवन' हे नाव मिळाले आहे. त्याप्रमाणे कावेरी व कोलोरून या नद्यांमधील प्रदेशास दक्षिणेकडील 'नंदनवन' (The Eden of the South) असे नाव मिळाले आहे.''[३]

**तंजावर येथील मराठी भाषिक समाज :**

तंजावर येथील मराठीला जवळ-जवळ साडेतीनशे वर्षांचा इतिहास आहे. तंजावर राज्य हे पाच सुभ्यांत विभागलेले होते. त्यामध्ये तिरूवारूर, कुंभकोणम, मायरूम, मन्नारगुडी आणि पदुकोट्टाई हे पाच सुभे होते. या सर्व सुभ्यातील गावांची संख्या ४७५३ गावे होती. मराठ्यांची वस्ती सगळीकडे परिसरात विखुरलेली होती. मतंजावरफ हे तत्कालीन राजधानीचे ठिकाण असल्यामुळे तंजावर व परिसरात आजही बरीच मराठी वस्ती आहे. मकुंभकोणमफ हे प्रसिद्ध शैव क्षेत्र आहे. या क्षेत्र परिसरात जवळजवळ चारशे मराठी भाषा बोलणारी कुटुंबे आहेत.

तंजावरच्या मराठी समाजाने दक्षिणेकडील तीर्थक्षेत्रे देवदेवतांशी भक्तीचे नाते जोडले. तसेच महाराष्ट्रातील देवदेवता, श्रद्धास्थाने याविषयी श्रद्धा व भक्ती कायम ठेवली. थोडक्यात तंजावरला मराठी लोकांनी विठ्ठल, खंडोबा व दत्तात्रेय ही दैवते नेली व त्यांच्यावरील श्रद्धा कायम ठेवली आहे. आजचे तंजावरी भाषेचे स्वरूप खूप बदलले आहे. तिच्यात प्रचंड तमिळ शब्द मिसळलेले दिसतात. पण तरीही मतंजावरी मराठी भाषाफ आपले मस्वतत्वफ हरवलेली नाही.

**तंजावर येथील मराठी लोकांची शिवक्षेत्रे :**

त्यागराज - तंजावरला मराठ्यांनी गादी स्थापन केल्यानंतर तिरूवारूर येथील त्यागराजाची ते निष्ठेने भक्ती करू लागे. हा त्यागराज म्हणजे शिव होय. तेथील शिव मूर्तीला सोमस्कंद म्हणून संबोधले जाते. सह+उमा+स्कंद म्हणजे सोमस्कंद. येथील महादेव हा पत्नी उमा व मुलगा स्कंद यांसह विराजमान आहे. महादेवाने समुद्रमंथनातील विष प्राशन केले व सृष्टीला वाचविले. म्हणजे त्याग केला म्हणून येथील शिवाला त्यागराज असे नाव पडले, अशी कथा जनमानसात प्रचलित आहे.

त्यागराजची शाहजीने आपल्या अनेक पदातून स्तुती गायिली आहे. शहाजी राजाची त्यागराजवर निस्सीम श्रद्धा होती तो म्हणतो,

''कधी भेटसी शिवशिवा । हर हर मज तू त्यागेश ।।
नेत्र तुझे दर्शन इच्छितात । श्रोतृ वरगुणचरित्र त्यागेश ।।



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

गात्र इच्छिते अष्टांग प्रणाम । वक्त्र सदा तुझे स्तोत त्यागेशा सतत।।
क्षण विरह तुझा न साहे अनुक्षण । दया करी शंकरा त्यागेश।।[४]

संत नामदेवांचा जीव जसा विठ्ठल भेटीसाठी कासावीस होत असे तसाच प्रत्यय शाहजीच्या पदांतून त्यागराजच्या संदर्भात येतो. 'देव त्यागेश भक्तीवीण भजन नाही' असे तो म्हणतो. तंजावरचा हा शाहजी त्यागराजाची पूजा झाल्याशिवाय सकाळचे भोजन करीत नसे. माधवात्मज (त्यागराजमहात्म्य), शाहजी (त्यागराजविलास) हे तंजावर मराठी साहित्यातील त्यागराजाचे वर्णन असणारे महत्त्वाचे ग्रंथ होत.

नटराज – हे शिवाचेच रूप. हा चिदंबर क्षेत्री नटराजाचा रूपात नृत्य 'पोजिशन' मध्ये उभा आहे. शाहराज याचाही भक्त होता. त्याने नटराजाच्या भक्तावर 'नीलकंठकुलालचरित्र' नावाचे सुंदर चरित्र लिहिले. यामध्ये कुंभार जातीतील प्रसिद्ध अशा शिवभक्त नीलकंठाची कथा आली आहे. नीलकंठ हा नटराजाचा महान भक्त होता. 'दृश्य पदार्थी विटले परि मन माझें नटेश्वरी नटले' अशी त्याची झालेली आपल्याला कथेतून प्रत्ययास येते.

नटराजाच्या विवाहप्रसंगावर आधारित 'शिवकामसुंदरीपरिणय' नावाचे एक सुंदर तेलुगु यक्षगान नाटक तुळजाराजा यांच्या नावावर आहे. राजा शिवाजी दुसरा याचे 'नटेशविलास' हे नाटक देखील नटराजांवर आहे.

'वैदीश्वरन' – हा देखील दक्षिण भारतात अर्थात तंजावरजवळील वैदीश्वरन कोईल या नावाने परिचित आहे. याला वैद्यनाथ असेही म्हटले जाते. शाहराज वैदीश्वराजाबद्दल म्हणतो,

"वैद्येश म्हणवितोस, भवरोग माझें हरवेना तुझ्याने
अवनीवरि व्यर्थ प्रसिद्धी कशास, आजिपासून हरहरतू नित्य."[५]

हे वैद्यनाथा! स्वत:ला वैद्यराज म्हणतोस पण रोग तर कोणताच दूर करत नाहीस! नुसते नाव मात्र मिरवितोस. येथे संत नामदेवाच्या 'पतित पावन नव्हेसी म्हणोनि जातो मी माघारा' या विठ्ठलाच्या संबंधित पद्यपंक्तीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. आणखीन एक शाहराजाच्या विशेष म्हणजे वैदीश्वराला आळविताना परळीच्या वैद्यनाथाची आठवण करून तो म्हणतो, रक्षी आधिव्याधिपासून परळी वैद्येश.[६] दक्षिणेकडील शिव मंदिराचे आणखी एक विशेष म्हणजे त्या तीर्थाशी, देव-देवतांशी कोणत्या ना कोणत्या भक्ताशी शिव क्षेत्राच्या कथांचा अन्वय जोडलेला दिसेल. उदा. तिरूवारूर-सुंदरराज, नटराज-तिरूनीलकंठ, काळहस्ती-कन्नपा, इत्यादी.

**जन सामान्यांचा देव – मुरुगन :**

उत्तरेकडे-श्रीकृष्ण, महाराष्ट्र-विठ्ठल तर दक्षिणेकडे सामान्यांचा देव म्हणजे 'मुरुगन' तामिळनाडूमधील जनसामान्यांचा देव म्हणजे मुरुगन असेही म्हटले जाते. या देवाचे वाहन मोर आहे. तंजावरकडील मराठी भाषिक समाजात मुरुगनाविषयी इतर देवाप्रमाणे श्रद्धा आहे. हा देवाचा सेनापती असून त्याला कार्तिकेय, सुब्रहमण्यम, षडायन, स्कंद या नावानेही तो परिचित आहे. महाराष्ट्रात कार्तिकेय असेच दैवत आहे. मात्र या दैवतासंदर्भात महाराष्ट्रात अनेक प्रतिबंध आहेत दक्षिणेकडे असे प्रतिबंध नाहीत. उदा. स्त्रियांना महाराष्ट्रात प्रवेश दिला जात नाही, परंतु आता ही परिस्थिती बदलली आहे.

या दैवताच्या संदर्भात रामचंद्र गोसावी या तंजावर कवीने 'सुब्रह्मण्यविवाह' नावाचे ५० श्लोकांचे एक आख्यान लिहिले आहे. त्यात सुब्रह्मण्य व इंद्रकन्या देवसेना यांच्या विवाहाचा सोहळा रंगविला आहे.[७] विरुपाक्ष कवीने भक्तविलास ग्रंथात आरंभी कार्तिकेयला वंदन केले आहे. दास कवी व शाहजीने त्यागेशपदात देखील याचे नमन केले आहे. यावरून तंजावरील मराठी लोकांत व तामिळनाडूतील हे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे, याचा निर्वाळा होतो.

काळहस्ति तिरूपतीपासून जवळ आजच्या चितूर जिल्ह्यामध्ये कालहस्ती मंदिर आहे. हे स्वर्णमुखी नदीच्या तीरावर चोल वंश राज्याचा शासनकाळात बाराव्या शतकात बांधले असा उल्लेख येतो. हे तंजावरच्या मराठी लोकांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान राहिलेले आहे. सर्फोजी राजा (दुसरा) याने मनीलभिल्लचरित्रफनावाने कालहस्तीच्या कन्नप भक्तावर आधारित कथा लिहिली. शाहजीने कालहस्तीचे स्तवन गायिले आहे. 'कालहस्ती' येथील हे शिवमंदिर भारतातील स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे.

**तंजावरील मराठी समाजाची वैष्णव क्षेत्रे :**

श्रीरंगम हे तामिळनाडूतील प्रसिद्ध असे वैष्णव क्षेत्र. तिरूचिरापल्लीपासून अगदी जवळ कावेरी व कोलेरून या नद्याच्या संगमावर हे एका बेटाप्रमाणे वसलेले आहे. 'कोलेरून' ही नदी कावेरीचीच एक उपशाखा आहे. 'आंडाळ' ही प्रसिद्ध संत



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

श्रीरंगनाथाची उपासक होती. विशिष्टाद्वैताचे प्रवर्तक श्रीरामानुजाचार्य यांनी आपले बहुतांश आयुष्य् याच क्षेत्री व्यतीत केले होते.

मराठी संताचे माहेर जसे पंढरपूर तसे 'अळवार' संतोच माहेर हे श्रीरंगम हे वैष्णव क्षेत्र. पोईगाई आळवार, भूत्तताळवार, कुलशेखर अळवार आदि प्रसिद्ध संतानी रंगनाथाची भक्ती केली. गंगाधर कवींची 'श्रीरंगनाथमहिमा' ही स्थलमहात्म्यपर रचना रंगनाथावर आधारित आहे. तसेच 'गोदादेवी' म्हणून तेलुगुतील कृष्णदेवरायकृत 'आयुक्तमाल्यदा' ही प्रबंधकाव्याचा विषय झाली.

विठ्ठलाशी मिळतीजुळती कथा ही राजगोपालाची आहे. मराजगोपालफ हे तामिळनाडूतील वैष्णवांचे महत्त्वाचे क्षेत्र तंजावरपासून अगदी जवळ २४ मैलावर मन्नारगुडी नावाच्या क्षेत्री हा राजगोपाल आहे. गोभिल व गोप्रलयाच्या तपामुळे विष्णू गोपालरूपात मचंपक वनातील मनारगुडी येथे येऊन निवास करू लागला. अशी कथा आख्यानामध्ये आली आहे. या क्षेत्री हरिद्रा नावाचे प्रसिद्ध 'कुंड' आहे.'[८] राजगोपाल या दैवतांवर श्यामराज कवीचे 'राजगोपालविलास' नावाचे आख्यान महत्त्वाचे आहे. यामध्ये कृष्णाची प्रणयकथा राजगोपालाभोवतीच गुंफलेली आहे. तंडालरामचंद्र या कवीने मनाच्या श्लोकाच्या धर्तीवर राजगोपालावर स्फुट रचना लिहिल्या.

किती पाहसी अंत या सेवकाचा । नव्हे मी कदाही उपेक्षावयाचा।
दयासागरा लोकविख्यात वीरा । करावी कृपा राजगोपाल धीरा ।।९

तंजावरच्या मराठी साहित्य-संस्कृतीचे अभ्यासक डॉ. मानिक धनपलवार यांच्या म्हणण्यानुसार विवाहसमयी म्हणावयाच्या मंगलाष्टकातून राज गोपालाचे स्तवन केलेले आढळून येते.[१०]

'अय्यप्प' देवाची उपासना तंजावरील मराठी समाज व तामिळनाडूमध्ये प्रचलित आहे. शिव व विष्णू यांचे मोहिनीरूप म्हणजे अय्यप्पदेव महाराष्ट्रातील मराठी समाजाचा हा देव अज्ञात आहे. मात्र तंजावरील मराठी समाजाच्या लोकजीवनात व साहित्यात याला महत्त्वाचे स्थान आहे. शाहजीचे 'हरिहरविलास' हे नाटक व सर्फोजीचे 'मोहिनी महेशपरिणय' हे सर्फोजी दुसरा यांचे नाटक हरिहर पूत्रावर आधारित आहेत. शाहजीने या देवाला 'हरिहरपूत्र' म्हणून संबोधले आहे.

सर्फोजी दुसरा यांचे 'मीनाक्षी परिणय' हे नाटक महत्त्वाचे आहे. या नाटकातून मीनाक्षी व तिचा पती सुंदरेश यांच्यावर आधारित आहे. मदुराईचे मीनाक्षी मंदिर तामिळनाडूमधीलच नव्हे तर भारतातील स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

सर्फोजी दुसरा हा मीनाक्षीच्या पाळण्यात लिहितो,
कुंडलिनी माया बीजासन घालुनियां बससी।
हरिविधि रूद्र सदाशिव ईश्वर बाळेनिपजविशी।''[११]

अशाप्रकारे मीनाक्षीला शक्तीच्या रूपात पाहिले आहे. तुळजाभवानीशी देखील पाळण्याच्या शेवटी रामचंद्रवरदायिनी शोभसि दावितव पदासि म्हणून साम्य दाखविलेले दिसते.

तंजावर येथील मराठी साहित्य आणि कावेरी नदी यांचाही अनोखा मेळ आहे. कावेरीच्या तीरावर श्रीरंगम, तिरुवय्यार (पंचनदीश्वर) कुंभकोणम (शिव) अशी अनेक क्षेत्रे आहेत. 'कुंभकोणम' सारख्या ठिकाणी मराठी भाषिक तुलनेने अधिक आहे. शाहजीने मगंगाकावेरी-संवादफ नाटक लिहिले. द्राक्षरस कावेरी, विश्वजननी म्हणून शाहाजी कावेरीचा गौरव करतो. कावेरीचे स्तवन करताना शाहजी लिहितो.

''शरणु कावेरीमाते सतत तुज
तुंगे अखिलान्त रंगे पाप संघ
अंगे पावनान्त रंगे जलनिधी
संगे पोषित विहंगे गति भु -
जंगे कमलराजित भृंगे शुभांगे''१२

**नायन्मार संतावरील मराठी साहित्य :**

दक्षिण भारतात शिवाचा इतका प्रचंड प्रभाव होता की, नायन्मार संतावर सुद्धा अनेक तंजावर कवींनी रचना केल्या. मागे उल्लेख केल्याप्रमाणे सर्फोजी दुसरा यांचे नीलकंठकुलचरित्र (तिरुनीलकंठ नायन्मार), नीलभील चरित्र (कन्नप नायन्मार), याशिवाय मेरुशिष्याचे 'पट्टिनमपुल्लाचे निरुपन' (पट्टिनत्तुपिल्ले) तसेच विरुपाक्ष कवीचा मभक्तविलासफशेष कवीचे हालास्य महात्म्य् हे दोन्ही ग्रंथ शैवभक्तीचे रहस्य उलगडविणारे महत्त्वाचे ग्रंथ होत.

उपरोक्त तंजावरील मराठी साहित्याची नोंद अपूर्ण आहे. तंजावरील मराठी भाषिकांच्या श्रद्धेची असलेली स्थळे देवदेवता क्षेत्रे व त्यावरील काही ग्रंथ व संस्कृतीचा उहापोह सदर लेखनात करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय अनेक देवदेवतांचे स्तवन, कीर्तन



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

...तील मराठी कवींनी केलेले आहेत. त्यामध्ये रामेश्वर, वेदवनेश्वर (...), एकांबेश्वर (कांची), कुंभेश (कुंभकोणम), जम्बुलिंगेश्वर, ... बृहदीश्वर, तिरुपतीचा व्यंकटेश, आनंदवल्ली (चोळराजांची ...देवता), अरुणाचलेश्वर, पंचनंदीश्वर (तिरुवय्यार) इत्यादी देव-...वरील त्यांच्या रचना आहेत. प्रस्तुत लेखातून काही ढोबळ ...णी शेवटी नोंदवली तर अप्रस्तुत ठरणार नाही.

१) तंजावरील मराठी राजे हे बहुभाषिकत्वाला अनन्यसाधारण ... दिले होते. मराठी भाषा व साहित्य याचे संवर्धन त्यांनी केले.

२) तंजावरील मराठी साहित्य दक्षिणेकडील देवदेवता, तीर्थ ... यावर आधारलेले आहे.

३) तंजावर हे बहुभाषिकत्वाचे कोंदण होते, त्यांनी विविध ...षा व साहित्याचा मसरस्वती महालफग्रंथालयाच्या रूपाने अनोखा ... घडवून आणला.

४) तेलुगु-संस्कृत-मराठी, फारशी व हिंदी भाषांवर शहाजी ...चे प्राविण्य होते. म्हणजेच सकल भाषा चतुर्विधा साहित्यनिर्वाहक ... पदवी शहाजींना जी दिली गेली ती त्याची निदर्शक आहे. तसेच ...र्फोजींचे देखील कार्य तेवढेच महत्त्वाचे आहे.

५) सर्फोजी, शाहजी व इतर मराठी राजे यांचे कलाचातुर्य, ...मर्मज्ञत्व, कलानिष्ठा, ही वाचकांना थक्क करून जाते.

६) तंजावर येथील 'पंचभाषाविलास' हे नाटक जरी डोळ्यासमोर ...ले तरी आजच्या 'आंतरभारतीला' संकल्पनेला जोमाने प्रेरणा ...ल असे वाटते.

७) थोडक्यात तंजावरील मराठी साहित्य मराठी राजे यांनी ...र्माण केले, चालना दिली. विविध नाटक व ग्रंथाची निर्मिती ...ली. कला-संस्कृती संवर्धनाला उत्तेजन दिले.

थोडक्यात तंजावर ही अर्थात सरस्वती महाल हे ग्रंथालय ...तच नव्हे तर जगातील एक उत्कृष्ट ग्रंथालय आहे. मराठी ...ांनी मराठी भाषा, संस्कृती तंजावर येथे नेल्या. लक्ष्मीनाराय... म्हणतात'[१३] याप्रमाणे ज्या प्रमाणे पाणी विविध वळणे घेत ...तीची गुणलक्षणे सोबत घेत पुढे-पुढे वाहत जाते, त्याप्रमाणे ...षा संस्कृती सुद्धा आपली अंगभूत गुणलक्षणे घेत तंजावर आणि ...सरात गेली आणि तेथे आपले अस्तित्व साहित्य आणि ...स्कृतीच्या माध्यमातून कायम केले.

संदर्भ :


१. धनपलवार मानिक : दक्षिण भारतीतील मराठी वाङ्मयाचा इतिहास दाक्षिणात्य साहित्य-संस्कृतीचा मराठीशी अनुबंध, प्रकल्प प्रकाशन राज्य मराठी विकास संस्था, प्रथमावृत्ती, १९९७, पृ.५

२. P.P. S. Sastri, Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts, vol. XIX, T.M.S.S Mahal Library, Tanjaore, 1934, P. VII

३. टी. आर. भीमराव, तंजावर येथील रामदासी मठ व साहित्य, पंचधारा, जुलै-डिसेंबर २००८, पृ. ५३

४. विश्वनाथन श्री. ना. (संपा.) श्री शाहजी महाराजविरचित मत्यागेशपदेफ सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर, १९८०, पृ. ८८,८९

५. तत्रैव, पृ. १६

६. तत्रैव, पृ. ६६

७. श्रीनिवाचार्य वे. (संपा.) विरुपाक्षकृत भक्तविलास १/१३, सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर, १९५२, पृ. ३९

८. धनपालवार मानिक (संपा.) श्यामराजकृत राजगोपालविलास, मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद, १९७४, पृ. १२९

९. तंडाल रामचंद्रावकृत कवितासंग्रह, श्रीपूर्णचंद्रोदय छापखाना तंजावर, श्लोक -९

१०. धनपलवार मानिक : दक्षिण भारतीतील मराठी वाङ्मयाचा इतिहास, उनि. पृ. १५९

११. तत्रैव, पृ. १८५

१२. विश्वनाथन श्री. ना. (संपा.) श्री शाहजी महाराजविरचित मत्यागेशपदेफ उनि. पृ. १०४

१३. भारुड अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ ७७ वे अ. भा. सा. संमेलन, औरंगाबाद, २००४, स्मरणिका, लेख - लक्ष्मीनारायन बोल्ली 'मध्ययुगीन तेलुगुन्मराठीचा साहित्यानुबंध', पृ. ७६


*-*-*



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad